**महत्वाचे**

दी.अं.यो.-रा.ना.उ.अ./SUH/कोविड-१९/ 1048
का.११/२०१९-२०/
राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
३ रा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, ३०.
दिनांक:
1 8 MAR 2020

प्रति,
शहर प्रकल्प अधिकारी,
राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
महानगरपालिका (सर्व)
नगरपरिषदा (SUH घटकाची अंमलबाजवणी करणा-या)

विषय : नागरी बेघरांसाठीच्या निवा-यामध्ये Covid-१९ बाबत जाणीव जागृती करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत..

संदर्भ :१) राज्यस्तरीय निवारा संनियंत्रण समितीचे मा. अध्यक्ष व सदस्य यांचा मेल दि. १७/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी प्रसिध्द केलेली कोविड-१९ माहिती पुस्तिका

दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत नागरी बेघरांना निवारा या उपांगामध्ये नागरी बेघरांसाठी निवारे कार्यरत करण्यात आलेले आहे. उपरोक्त संदर्भ १ नुसार राज्यस्तरीय निवारा संनियंत्रण समितीचे मा. अध्यक्ष व सदस्य यांनी निवा-यामध्ये कोविड-१९ बाबत जाणीवजागृती करणे व त्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणेबाबत सूचित केलेले आहे. बेघर समूह हा सर्वात जास्त असुरक्षित समूह असल्यामुळे अशा प्रकारच्या विषाणूची बाधा होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे निवा-यातील बेघर व नवीन येणारे बेघर यांची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे.

तरी सर्व शहर प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे उपाययोजना कराव्यात.

१. संपूर्ण निवा-यामध्ये जंतुनाशकाचा उपयोग करून सर्व खोल्या, बेडशिट, चादर व इतर वस्तु स्वच्छ कराव्यात.

२. निवा-यामध्ये साबण / sanitizer व पाण्याची पुरेशा प्रमाणात व्यवस्था करण्यात यावी.

Scanned with CamScanner

३. निवा-यातील लाभार्थींच्या वारंवार स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

४. निवा-यातील बेघर व निवारा कर्मचारी यांचा कोविड-१९ पासून बचाव करण्याबाबत उपाययोजना आखण्यात याव्यात.

५. निवा-यातील लाभर्थ्यांची प्रतिकार शक्ती वाढविण्याच्या दृष्टीने पौष्टिक आणि सी जीवनसत्वे असलेला आहार उपलब्ध करावा.

६. निवा-यातील लाभार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी.

७. निवारा व्यवस्थापन यंत्रणेने निवा-यातील लाभार्थ्यांच्या स्थितीची माहिती शहर अभियान व्यवस्थापक यांना वेळोवेळी अवगत करावी.

८. शहर अभियान व्यवस्थापक यांनी समन्वयक म्हणून काम पहावे.

९. सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी प्रसिध्द केलेली कोविड-१९ माहिती पुस्तिकेचे पोस्टर तयार करून ते निवा-याच्या दर्शनी भागामध्ये लावण्यात यावे. सदर माहिती पुस्तिकेच्या आधारे निवा-यातील लाभार्थ्यांसाठी त्यांना समजेल अशा सोप्या भाषेमध्ये जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित करावे. त्यांना वारंवार स्वच्छतेचे महत्व समजावून सांगण्यात यावे.

१०. निवा-यामध्ये जर कोणी संशयित व्यक्ति आढळून आल्यास त्वरित डॉक्टरांद्वारे तपासणी करण्यात यावी.

११. सार्वजनिक विभागाने जाहीर केलेल्या अधिसूचना, परिपत्रके यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

सोबत जोडण्यात आलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहिती पुस्तिकेनुसार शहर प्रकल्प अधिकारी यांनी नागरी बेघरांसाठीच्या निवा-यामध्ये कोविड-१९ बाबत जाणीव जागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणेबाबत दक्षता घ्यावी. उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घ्यावा. तसेच सदर नियोजनावाबत, जाणीव जागृती कार्यक्रमबाबत व बेघरांच्या आरोग्यविषयक स्थितीबावतचा दैनंदिन अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करावा.

17/03/2020

(भालचंद्र बेहेरे)
उप संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत: मा. अध्यक्ष व सदस्य, राज्यस्तरीय निवारा संनियंत्रण समिती, यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned with CamScanner